जमातवाद : समज-गैरसमज

सूर्यनारायण रणसुभे

या देशातील सामाजिकतेच्या स्वरूपाचा किंवा इतिहासाचा अभ्यास करणे हे एक फार मोठे आव्हानात्मक काम आहे. येथील सांप्रदायिकतेला इतके विविध पदर आहेत आणि त्यांत इतकी गुंतागुंत आहे की त्यातून नेमके जे हवे आहे ते शोधून काढणे खूपच अवघड आहे. हिंदू-मुस्लिम तणाव एवढ्याच मर्यादित अर्थाने सांप्रदायिकता या शब्दाचा येथे वापर केला जातो. इतिहासाचा अभ्यास हादेखील असाच वादाचा आहे. या देशातील इतिहासात सांस्कृतिक समन्वयाची, भावनात्मक एकतेची, धर्म आणि संप्रदायाच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून जगण्याची जेवढी अखंड अशी प्रदीर्घ परंपरा आहे तेवढीच धर्माच्या अनुषंगाने द्वेषाची, तिरस्काराची, युद्धाची, दंग्याचीदेखील तुटक परंपरा आहे. अमृत आणि विष यातील हा संघर्ष इस्लामच्या येथील आगमनापासून स्पष्टपणे दिसून येतो. (संस्कृति के चार अध्याय : प्रकरण ७, 'अमृत और हलाहल का संघर्ष' हे पूर्ण प्रकरण पहावे.) [१]

मूलभूततावादी मंडळी इतिहासाचे दाखले देऊन दोन धर्मानुयायांमधील अंतर रुंदावण्याचा प्रयत्न करीत राहिले आहेत तर माणुसकीवर नितान्त श्रद्धा बाळगणाऱ्यांनी इतिहासातून समन्वयाची, अमृतत्त्वाची उदाहरणे दिलेली आहेत. म्हणजे दोन परस्परविरोधी ताकदींना खाद्य पुरविण्याची ताकद इतिहासात आहे. प्रश्न एवढाच आहे की, वर्तमानकाळातील पिढीसमोर आपण इतिहासातील रक्तरंजित पाने ठेवणार आहोत, की समन्वयाची आणि माणुसकीनी भरलेली पाने ? तसे पाहता मूलभूतवाद्यांचा आणि मानवतावाद्यांचा हा झगडा काही आजचा नाही. अगदी इस्लामच्या आगमनापासून या दोन शक्ती परस्परविरुद्ध काम करीत आलेल्या आहेत. धर्माचा म्हणजे धर्मश्रद्धेचा जाणीवपूर्वक सत्तेचे राजकारण खेळण्यासाठी उपयोग करून घेणाऱ्यांचा वर्ग इतिहासात पदोपदी आढळतो. त्याच वेळी सत्तेपासून दूर राहणारी किंवा सत्ता बळकावण्याचे कसलेही ध्येय न ठेवणारी अनेक संवेदनक्षम मंडळी धर्माचा माणुसकीशी निगडित अर्थ सर्वसामान्यांना पटवून देत देत कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्षपणे मूलभूतवाद्यांशी वैचारिक पातळीवर झुंज देण्याचा, कधी यशस्वी तर कधी अयशस्वी प्रयत्न करीत राहिले आहेत.

> "हिंदू-मुस्लिम एकतेच्या विरुद्ध विषारी प्रचार करण्याचे कार्य अकबराच्या काळी श्री. शेख अहमद सरहिंदी करीत होते. पण अकबराचे अफाट साम्राज्य होते, संपूर्ण देशावर त्याचे नियंत्रण होते. त्यामुळे शेख अहमदाचा प्रचार फोफावू शकला नाही." [२]

मात्र, सांप्रदायिकतेचा प्रश्न केवळ आपल्याच देशात आहे आणि इस्लामचे अनुयायी येथे असल्यामुळेच हा प्रश्न तीव्र होऊ लागलेला अशा भ्रमात राहण्याची गरज नाही.

प्रत्येक धर्माचा जन्म माणसाच्या विवेकातून, नैतिकतेसंबंधीच्या त्याच्या आग्रही भूमिकेतून झालेला आहे. जगातील सर्वच धर्मग्रंथ हे मुळात मूल्यबोध देणारी संविधानेच आहेत. त्या त्या काळात, त्या त्या जनसमूहाच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी ज्या ज्या मूल्यांची गरज तीव्रपणे जाणवली; ती ईश्वरी आदेशाच्या नावावर शब्दबद्ध करणारे ग्रंथ म्हणजे धर्मग्रंथ. किंवा उलटचा दिशेने याची व्याख्या करावयाची झाल्यास, विशिष्ट काळात जी जुनी मूल्यव्यवस्था व्यक्तिमत्त्व विकासासाठी चुकीची ठरत होती, जिच्यामुळे गतिमान जीवनात जडता येऊ पाहात होती, माणुसकीच्या आणि विवेकालाच संपवणारी मूल्यव्यवस्था रूढ होऊ पाहात होती, किंवा कालौघामध्ये जी माणसकी आणि विवेकाचे मूल्यच हरवून बसली होती, अशा मूल्यव्यवस्थेच्या विरोधात जाऊन व्यक्तिमत्त्व विकासासाठी विवेक आणि नैतिकतेस सतत तेवत ठेवणारी नवी मूल्यव्यवस्था जो कोणी देत असतो तो धर्मसंस्थापक व

अनुक्रमणिका

ज्या पुस्तकातून ते हे सर्व मांडले जाते ते पुस्तक म्हणजे धर्मग्रंथ, अशी करता येईल.

धर्म आणि मूल्ये, विवेक व नैतिकता यांचा इतका जवळून संबंध असल्यामुळे या शब्दांना एकमेकांचे पर्यायी शब्द म्हणून स्वीकारले जात होते. आजही स्वीकारले जाते. "वैदिक व हिंदू धर्मांच्या वैचारिक इतिहासाप्रमाणे धर्म म्हणजे नैतिक कायदा किंवा कर्तव्य याचा वैचारिक दृष्टचा मूलस्रोत वैदिक "ऋत" या अर्थापर्यंत जाऊन पोहोचतो... मानवांचे वैयक्तिक वसामाजिक कर्तव्य व सदाचरण यांच्या रूपाने त्याच ऋताचा आविष्कार म्हणजे धर्म (नैतिक कायदा व कर्तव्य) होय."[३]

हे सर्व जरी खरे असले तरी वस्तुस्थिती काय म्हणते ? या प्रश्नावर अतिरेकी भूमिका घेणारे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात, की धर्माचा इतिहास हा शरमेने मान खाली घालायला लागावी असा इतिहास आहे.

"भारतातील इस्लामचा सुरुवातीचा इतिहास हा अत्याचाराचा, अन्यायाचा, धर्म-परिवर्तनाचा आणि अभद्रतेचा इतिहास आहे."[४] इतिहासातील रक्तरंजित पाने दाखवण्याचा प्रयत्न मूलभूततावादी व मानवतावादी दोघेही तेवढ्याच आक्रमक भाषेत करीत असतात. दोन धर्मांतील, दोन संप्रदायांतील संबंधांचा हा इतिहास रक्तरंजित आहे, माणुसकीला काळिमा फासणारा आहे म्हणून तो नाकारला पाहिजे असा आग्रह मानवतावाद्यांचा असतो. तर भूतकाळात आमच्यावर अत्याचार झालेले आहेत, आमच्या धर्मभावना दुखावल्या गेल्या आहेत, प्रतिपक्षीय धर्मानुयायी क्रूर आहेत म्हणून तिरस्करणीय आहेत, ज्या वेळी त्यांच्या हातात सत्ता होती त्या वेळी त्यांनी आमचा छळ केलेला आहे, त्यामुळे त्यांना धडा शिकवला पाहिजे, अशी हिंदुत्ववादी मूलभूततावाद्यांची मांडणी असते. इतिहासातील एकाच घटनेचे दोन परस्परविरोधी पण स्वतःच्या सोयीनुरूप अर्थ लावण्याची ही धडपड सतत चाललेली दिसून येते. पण यासोबतच संबंधित दोन धर्मीयांना समन्वयाचा, सांस्कृतिक एकतेचा, माणुसकीचा फार मोठा इतिहासदेखील आहे. किंबहुना, या प्रकारे जगणारेच संख्येने अधिक आहेत. ते इतिहासात होते व वर्तमानात आहेत, आणि भविष्यातदेखील यांचीच संख्या फार मोठी असणार आहे. पण यांचा विचारच केला जात नाही. आपणास परिचित इतिहासग्रंथ या जनसामान्यांच्या जीवनाचा, वाटचालीचा, मनोधारणांचा इतिहास सांगत नाहीत. त्या त्या काळातील अल्पसंख्याकांचा, सत्ताधाऱ्यांचा, धर्मसंस्थापकांचा किंवा असामान्य व्यक्तींचा, महापुरुषांचा इतिहास लिहिला जातो. इतिहासग्रंथांमधील बरीचशी पाने उलथापालथी, क्रांत्या, स्वाऱ्या/मोहिमा, लढाया, क्रौर्य व शौर्य, जय-पराजय यांच्या वर्णनांमध्ये खर्ची घातलेली असतात. सर्वसामान्यांचा जगण्याचा, संघर्षांचा, त्यांच्या सांस्कृतिक-धार्मिक एकतेचा इतिहास क्वचितच लिहिला जातो. आणि तो कितीही अभ्यासपूर्ण लिहिला गेला तरी त्याची फारशी चर्चा होत नसते. सर्वसामान्यांच्या जीवावरच इतिहासाची रक्तरंजित पाने रंगलेली असतात किंवा त्यांच्या सहकार्यामुळेच महान मानवी मूल्यांचा प्रचार–प्रसार होत असतो. हे सर्व असूनदेखील ते पडद्यामागेच असतात. गंमत म्हणजे इतिहासातील ही रक्तरंजित पाने घेऊन मूलभूततावादी या सामान्यांकडे जाऊन त्यांनाच साकडे घालतात. इतिहासातील अपवादात्मक व्यक्तींच्या राक्षसी प्रेरणांचा प्रचार–प्रसार करून या सर्वसामान्यांना पुन्हा रक्त-रंजित इतिहास घडवण्यासाठी प्रवृत्त करीत असतात. दुर्दैवाने या जनसामान्यांना द्वेष, तिरस्कार, अस्मिता यांसारख्या भावना आणि जात, धर्म इत्यादी घटक यांच्या आधारे आपल्यामागे खेचणे फार सोपे असते. त्यामुळे इतिहास खरा असो की खोटा रचलेला असो, आपल्यामागे जनशक्तीला उभे करणे सोपे असते. माणसातील विवेकाला, नैतिकतेला आव्हान करून त्याला उभे करणे खूप अवघड आणि आव्हानात्मक असते.

मग येथे असा प्रश्न पडतो की, माणसातील अविवेकाला आव्हान करणे सोपे का असते ? साहित्यविषयक भारतीय चिंतनात "रस" या संकल्पनेस खूपच मोलाचे स्थान आहे. रससंबंधी विवेचन करताना भारतीय आचार्यांनी नवरसांची कल्पना केलेली आहे. या नवरसांत श्रृंगार, वीर, भय व वात्सल्य हे मूळ आणि जन्मजात (त्यांच्या शब्दांत पूर्वजन्मातून आलेले) "भाव" आहेत. पण रौद्र व बीभत्स हे "भाव" जन्मानंतरच्या संस्कारांतून, कुटुंबव्यवस्थेतून, शेजारपाजाऱ्यांकडून मित्र-मंडळी व शाळेतून होत असलेल्या संस्कारांतून हळूहळू आकार घेत असतात, असे अनेक

उदाहरणांतून ते सिद्ध करून दाखवतात. आपल्याकडे "वर्ण", "जात" व "धर्माचे संस्कार" (विवेक किंवा नैतिकता वगळून) हे अगदी लहान वयापासून वेगवेगळ्या माध्यमांतून जाणते-अजाणतेपणे केले जातात आणि त्यांतूनच विशिष्ट जातीबद्दलचा अहंकार किंवा तिरस्कार किंवा इतर धर्मांबद्दलचे पूर्वग्रह आकार घेत असतात. "मूलभूततावादी" किंवा ज्यांचे हित-संबंध धर्मात अडकलेले असतात ते या प्रकारचे संस्कार जाणीवपूर्वक करीत असतात.

वर्ण आणि जातीत विभागलेल्या येथील समाज-व्यवस्थेमुळे वरच्या वर्णांचे सतत फावत होते. या विभागणीचा आर्थिक आणि राजकीय फायदा वरच्या वर्णांनाच मिळत होता. कोणत्याही समाजव्यवस्थेत अर्थ आणि सत्ता यांची केंद्रस्थळे ज्यांच्या हातात असतात त्यांना कोणत्या ना कोणत्या पद्धतीने दुभंग-लेल्या समाजाचीच गरज असते. या दुभंगलेल्या समा-जातच त्यांचे हितसंबंध सुरक्षित राहात असतात. शोषणाची प्रक्रिया अधिक संथपणे आणि उदात्ततेच्या नावावर चालत असते. अशा या समाजव्यवस्थेतील उच्चवर्णियांच्या वास्तव स्वरूपाचे भेदक दर्शन एखादी संवेदनक्षम व्यक्ती ज्या वेळी करू लागते त्या वेळी या वर्गाचे हितसंबंध धोक्यात येतात. अशा वेळी त्यांना जुन्या वर्ण किंवा जातिव्यवस्थेचे खुले समर्थन करता येत नाही, कारण या दोन्हींवर कडाडून टीका कर-णाऱ्यांकडे सर्वसामान्य जनता आकृष्ट होत असते. अशा वेळी या सर्वांना समान सूत्रात बांधणारा धागा ते शोधू लागतात. हा धागा बहुतेक वेळा धर्माचा असतो. कधी तो वंशप्रभुत्वाचा असतो तर कधी रंगभेदाचा असतो.

लोकशाहीव्यवस्था रूढ होण्यापूर्वी जी राजेशाही-व्यवस्था अस्तित्वात होती त्या वेळी या वर्गाचे काम खूपच सोयीचे होते. राजा हा धर्मप्रमुखांच्या नियंत्रणा-खाली राहात असेल तर मग तेथे कसल्याच संघर्षाची, मतभेदाची गरज नव्हती. राजा आणि धर्मप्रमुख यांचे हितसंबंध एक असल्यामुळे धर्माच्या नावावर जनतेला संघटित करण्याची गरज त्यांना भासत नव्हती. पण हा राजा जर समतेची भाषा बोलत असेल, सर्व धर्म समभावाची भाषा बोलत असेल किंवा धर्म आणि जनता यांच्यातील दलालांना नाकारत असेल तर मग अनेक कटकारस्थाने करून त्या राजाला पदच्युत करण्यावाचून दुसरा मार्गच त्यांच्यासमोर नसायचा. अशा वेळी त्या राजास अधर्मी, क्रूर, अन्यायी किंवा अशीच विशेषणे वापरून जनतेला त्याच्याविरुद्ध भडकावण्याची कारस्थाने होत होती. धर्माबद्दलची गाढ श्रद्धा आणि ईश्वराबद्दलची भीती यांमुळे यांच्या प्रचारयंत्रणेला वेग यायचा. यांना जसा अकबर बादशहा पुरून उरला तसा एखादाच राजा पुरून उरायचा. "हिंदू-मुस्लिम एकतेच्या विरुद्ध आपला प्रचार शेख अहमद सरहिंदींनी अकबराच्या राज्यकाळापासूनच सुरू केला होता. परंतु अकबराचा दरारा संपूर्ण देशभर होता, त्यामुळे शेख अहमदाचा प्रचार जोर पकडू शकला नाही. पण अकबराच्या मृत्यूनंतर शेख अहमद निर्भयपणे मुसलमानांत धार्मिक द्वेषाची आग भडकावू लागला."[५] आपल्यास ही वेळ प्रतिकूल आहे असे समजून ही मंडळी त्या वेळी प्रसंगी गप्प बसायची. पण त्यांना प्रतिसाद देणारा राजा आला की मग तेवढ्याच वेगाने ही मंडळी डोके वर काढायची. धर्माच्या नावावर यांचे हितसंबंध जपणारा राजा आला तरी मग त्याचे भरपूर कौतुक करायचे, त्याला देवासमान घोषित करायचे. एखादा राजा जर त्यांचे हितसंबंध डावलून, यांचे महत्त्व कमी करून जनतेत लोकप्रिय झाला तर मग पुढील काळात त्यालाच देव करून, त्याच्या अवती-भोवती कर्मकांडाचे स्तोम माजवून तो आपल्याच बाजूचा होता हे सिद्ध करावयास ही मंडळी कधीच मागेपुढे पाहात नसत. केवळ राजाच्याच बाबतीत नव्हे तर अनेक संतांच्या बाबतीतदेखील हे घडलेले आहे. उदाहरण म्हणून महात्मा गौतमबुद्धापासून ते ज्ञानेश्वर, बसवेश्वरापर्यंत कोणाचेही देता येईल.

पण लोकशाहीव्यवस्था स्वीकारल्यानंतर मात्र यांची खूपच अडचण झालेली आहे. कारण आतापर्यंत "राजा" या शक्तीच्या माध्यमाने यांचे खेळ चालायचे. जनतेला कर्मकांडात किंवा अनेक वर्णांत, जातींत विभागून तिच्यावर नियंत्रण ठेवणे शक्य होते. मध्य-काळात महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाने व हिंदी प्रदेशांतील निर्गुणी संतांनी यांचे वर्चस्व झुगारून देण्याचा प्रयत्न बऱ्याच प्रमाणात यशस्वी करून दाखवला होता. पण पुढच्या काळात एकेका संताचे एकेक पीठ कायम करून, त्यावर याच मंडळींनी आपल्या नेतृत्वाची पकड बसवली. त्यामुळे संतांचे आक्रमक आणि विद्रोही विचार हे भजन-कीर्तनापर्यंतच मर्यादित

राहिले.

१८५७ नंतर म. जोतिबा फुले, महर्षी दयानंद, शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांनी, सरळसरळ यांच्या प्रतिष्ठेला आव्हान दिले. अनेक पुराव्यांसहित यांचा कावेबाजपणा जनतेच्या लक्षात आणून दिला. त्यामुळे काही प्रमाणात का होईना जात, पंथ, वंश व वर्ण विसरून माणसे एकत्र येऊ लागली. अशा वेळी कोटयवधी जनतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी, आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी धार्मिक अस्मितेला आवाहन करण्यावाचून, धार्मिक अहंकार जोपासण्यावाचून यांना दुसरा पर्याय नव्हता.

भारताच्या अडीच हजार वर्षांच्या ज्ञात इतिहासात धर्माच्या नावावर जनतेला संघटित करण्याचा प्रयत्न १८५० नंतरच दिसून येतो. बुद्ध धर्माच्या विरोधात हिंदूंना संघटित करण्याचा यशस्वी प्रयत्न आठव्या शतकातील शंकराचार्यांनी केलेला होता. हे संघटन वर्णव्यवस्थेला बळकट करण्यासाठी होते आणि त्यासोबतच बौद्धधर्माला संपवण्यासाठी म्हणूनदेखील होते. सत्ता प्राप्त करून घेण्यासाठी म्हणून धर्माचा उपयोग ही अगदी अलीकडची, म्हणजे १९२० नंतरची घटना आहे. १९२० पूर्वी हिंदू धर्मात सुधारणेच्या अनेक चळवळी चाललेल्या होत्या. ख्रिश्चन धर्माच्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी म्हणून हिंदू धर्माच्या सुधारणांची गरज या मंडळींना वाटत होती. त्यामुळे ब्राह्मो समाजापासून ते दयानंदाच्या आर्यसमाजापर्यंतच्या चळवळी या हिंदू धर्माच्या सुधारणेच्याच चळवळी आहेत. तत्पूर्वी मध्यकाळातदेखील सुधारणेचा हा प्रयत्न झालेला आहे, पण हा प्रयत्न एक तर वैयक्तिक पातळीवरून चाललेला आहे. या प्रयत्नाला तत्कालीन बुद्धिवाद्यांचा व राजसत्तेचा कसलाच पाठिंबा किमान त्या काळात मिळालेला दिसून येत नाही. परंतु १८५० ते १९२० पर्यंतच्या काळातील चळवळी या संस्थात्मक आहेत, फार मोठ्या प्रमाणात बुद्धिवाद्यांचा याला पाठिंबा आहे आणि मुख्य म्हणजे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे राजसत्तेचा या सुधारणेला पाठिंबा आहे.

"लॉर्ड विल्यम बेंटिक (१८२८-१८३५) याने आपल्या सात वर्षांच्या कारकीर्दीत हिंदूंतील क्रूर चाली बंद केल्या, जातिभेदास चाट दिली... १८२९ मध्ये बेंटिकने सतीची चाल इत्यादी कायद्याने गुन्हा ठरवल्या. राजस्थानातील काही जमातींत मुलीचा जन्म झाल्यावर तिला ठार मारण्याची पद्धतदेखील त्याने कायद्याने बंद करवली."[६]

सुधारणेच्या या काळात इतर धर्मांबद्दलची फारशी कटुता आढळत नाही. आमच्या धर्मावर तुम्ही जी टीका करीत आहात त्यात तथ्य आहे हे कबूल, पण आमच्या धर्माचे ते खरे स्वरूप नाही. खऱ्या स्वरूपातील आमचा धर्म तुमच्यापेक्षा श्रेष्ठ आहे ही भावनादेखील त्यात आहे. यात ज्याप्रमाणे आत्मपरीक्षणाचा भाग आहे, तात्त्विक विवेचन आहे, नम्रता आहे, चुकीची कबुली देण्याची तयारी आहे. त्याचप्रमाणे धर्मग्रंथांची, कर्मकांडांची व रूढींची (ओढूनताणून विज्ञाननिष्ठ) व्याख्या करण्याचा प्रयत्नही आहे, आणि जे चुकीचे आहे ते टाकण्याचा उदारपणादेखील आहे. येथे धर्माचा वापर इतर उद्दिष्टांसाठी करण्याचा हेतूच नाही. त्यामुळे संघर्षाचा प्रश्नही नाही. उलट, स्वतःच्या धर्माचे खरे स्वरूप शोधता शोधता इतरांच्या धर्मातील श्रेष्ठ तत्त्वे स्वीकारण्याचा मोठेपणा आहे.

"ख्रिस्तधर्मी आपला पवित्र ग्रंथ जगात कोठेही वाचू शकतात; मुसलमान आपले कुराण कोठेही वाचू शकतात; मग ब्राह्मणांनी आपला वेद आणि मनुसंहिता का लपवावी, असा मूलभूत प्रश्न फुल्यांनी विचारला आहे."[७]

लोकशाहीव्यवस्थेसोबत जी मूल्यव्यवस्था हळूहळू रुजत जाते ती धर्मव्यवस्थेस छेद देते. ही व्यवस्था मूठभरांचे नियंत्रण संपवून टाकते आणि परिवर्तनाची शक्यता निर्माण करते. येथे जात, धर्म, वर्ण, वंश यांच्या पलीकडे जाऊन केवळ माणसाच्या अस्तित्वाचा, त्याच्या अस्मितेचा विचार केला जातो. माणसाचे माणूसपण टिकवत जाणे, त्याच्या विकासासाठी योग्य त्या सोयी उपलब्ध करून देणे, शेकडो-हजारो वर्षांपासून तो ज्या आधिदैविक शक्तीच्या नियंत्रणाखाली जगत होता, त्यातून त्याला मुक्त करणे, त्याच्या हक्कांची त्याला जाणीव करून देणे यासाठीचा प्रयत्न यात होत असतो. धोरणे तयार करताना येथे धर्म किंवा धर्मानुयायांना फारसे महत्त्व नसते. अल्पसंख्याक किंवा बहुसंख्याक हा प्रकारदेखील तत्त्वतः मान्य नसतो. बहुसंख्य जनतेचे प्रतिनिधी व त्यांचे राज्य असे त्यांचे स्वरूप असते. आणि स्वतःच्या धर्माचे व धर्मानुयायांचे वेगळेपण टिकवून ठेवणाऱ्यांना नेमके हेच नको असते. स्वतः जिना हे लोकशाहीप्रेमी होते. धर्मनिरपेक्षतेवर त्यांचा विश्वास

अनुक्रमणिका

होता, पण सत्तेचे राजकारण खेळताना मात्र त्यांनी सतत अल्पसंख्याक आणि बहुसंख्याक या शब्दांचा वापर करून बहुसंख्याकांचे राज्य म्हणजे हिंदूंचे राज्य अशी सोयीची व्याख्या केलेली आहे.

"सप्टेंबर १९३९ मध्ये मुस्लिम लीगच्या कार्यकारणीने हे जाहीर केले होते की, मुस्लिम-भारत कोणत्याही परिस्थितीत संघराज्याचे (federal objectives) समर्थन करू शकत नाही. भारतीय संघराज्य याचा अर्थच होतो बहुसंख्याकांचे अल्पसंख्याकांवर राज्य. लोकशाही आणि लोकसभेच्या नावावर एका बहुसंख्याक जातीचा (किंवा धर्माचा) दुसऱ्या अल्पसंख्याक जातीवर (किंवा धर्मावर) राज्य एवढाच लोकशाहीचा अर्थ होतो "[७अ]

सत्तेजवळ जाण्यासाठी किंवा वेगळे राष्ट्र मिळवण्यासाठी जिना बहुसंख्याकांची भीती दाखवून लोकांना आपल्या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धान्ताकडे आकृष्ट करीत होते. तर त्या काळचे हिंदुत्ववादी अल्पसंख्याकांची भीती दाखवून हिंदू राष्ट्राच्या स्थापनेची भाषा बोलत होते. एकमेकांबद्दल अविश्वास, संशय, भीती दाखवल्याशिवाय आपले इप्सित साध्य करणे दोघांनाही अवघड होते. येथे फाळणीपूर्वीच्या राजकारणाची मीमांसा करण्याची इच्छा नाही पण स्वातंत्र्यानंतरच्या काळातदेखील ही भीती दाखवण्याचा प्रयत्न होतोय, याला कारण पुन्हा तेच आहे. जात आणि संप्रदायाच्या नावावर माणसे जरी विभागली गेलेली असली तरी ती त्यासाठी वाटेल ती किंमत मोजावयास तयार नसतात. जातीच्या विरोधात गेल्यामुळे दैनंदिन किंवा कौटुंबिक जीवनावर फारसा परिणाम होत नाही हे त्यांना आता पक्के जाणवले आहे. धर्मसुधारणेच्या प्रश्नावर शंभर वर्षांपूर्वी ज्या तात्त्विक चर्चा व्हावयाच्या त्यांत रस घेणारा वर्गदेखील दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. उलट, सार्वजनिक जीवनात धर्माची गरजच काय असे त्याला वाटू लागले आहे. म्हणजे बौद्धिक पातळीवर लोकांना संघटित करणे शक्य नाही हे स्पष्ट झाले आहे. अशा वेळी इतरांबद्दल घृणा, तिरस्कार, शंका निर्माण करून, इतिहासाची आपल्या गरजेनुसार विकृत व्याख्या करून त्याला संघटित करणे शक्य आहे हे या वर्गास मागील काही वर्षांच्या स्वतःच्या अनुभवांतून लक्षात आले आहे.

प्रत्येकाच्या मनात या देशाबद्दलच्या विकासाची काही स्वप्ने आहेत, काही अपेक्षा आहेत, स्वातंत्र्यापूर्वी दिली गेलेली आश्वासने अजून ताजी आहेत असे प्रत्येकाला वाटते. आपला देश समृद्ध व जगभर प्रतिष्ठित असावा असे प्रत्येकाला वाटते. चाळीस वर्षांत या स्वप्नांची पूर्तता होऊ शकलेली नाही. आर्थिक दृष्टया देश समृद्ध होऊ शकलेला नाही. प्रत्येक प्रांतात नवनवीन प्रश्न उभे राहात आहेत, शेकडो माणसे मारली जात आहेत. कोटयवधींची मालमत्ता उद्ध्वस्त होत आहे. सर्वच क्षेत्रांत भ्रष्टाचार माजलेला आहे. अशा वेळी या प्रश्नांच्या विरोधात जनशक्ती उभी करून सत्तेपर्यंत जाणे हे खूप जिकिरीचे काम आहे. कारण या सर्व प्रश्नांचा संबंध अर्थव्यवस्थेशी, भ्रष्ट राजकारणाशी आहे. असा लढा प्रदीर्घच असणार. त्यापेक्षा प्रत्येकाच्या मनातील स्वप्नांना आवाहन करून, या स्वप्नांचा चुराडा होण्यामागे कोणी तरी एक काल्पनिक शत्रू उभा करणे सोपे असते. आपल्या या अवनतीचे कारण म्हणजे आपले धर्मापासून दूर जाणे हे पटवणे आणि त्याच वेळी आपल्या या स्थितीसाठी कोणी तरी दुसरे कारणीभूत आहेत असे सांगणे सोपे असते. ते पटवून घेणे तर आणखीनच सोपे असते. अवघड आणि किचकट प्रश्न सोडवण्याची एक धूर्त पद्धत असते. ती म्हणजे अशा प्रश्नाचे उत्तर आधी तयार करायचे आणि मग कुठल्याही मार्गाने का होईना त्या उत्तरापर्यंत यायचे. देशाच्या इतिहासाची मांडणीदेखील त्याच पद्धतीने करायची. प्रतिकूल परिस्थितीमुळे भांबावलेला माणूस हा परिवर्तनासाठी आसुसलेला आहे. त्या वेळी त्याच्या मनातील अहंकाराला, श्रेष्ठत्वाला, तिरस्काराला, संशयाला धर्माच्या नावाने पेटवत जाणे सोपे असते. एकदा उत्तर ठरल्यानंतर मग आरोप करणे सोयीचे असते. मागील काही वर्षांपासून या वर्गाने मुस्लिमांबद्दल सतत आक्रमकतेचे धोरण अवलंबिलेले आहे. जे वेगवेगळे आरोप त्यांच्यावर करण्यात येत आहेत, त्याचा परामर्श आता आपण घेऊ.

मुसलमानांचे लाड

भारतीय जनता पक्षाची आणि या पक्षाबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्या बहुतेक सर्वांची अशी तक्रार आहे की एक भाजप सोडला तर या देशातील सर्वच पक्षांनी मतांच्या राजकारणासाठी मुसलमानांचे भरपूर लाड केलेले आहेत आणि आजदेखील करीत आहेत.

स्वातंत्र्यानंतर ते आजपर्यंत प्रत्येक निवडणुकीच्या वेळी किंवा इतर वेळीदेखील त्यांची हीच तक्रार असते. बहुसंख्याक हिंदूंना या तक्रारीत तथ्य वाटते. या लाडासंबंधीचे जे पुरावे सादर केले जातात, त्याचा संबंध मुसलमानांच्या दैनंदिन जीवनाशी किंवा आर्थिक सुबत्तेशी, शिक्षणाच्या किंवा नोकरीत दिल्या जाणाऱ्या सवलतींशी कोठेच नाही. मुसलमानांना कायदेशीरपणे चार लग्ने करण्याचा दिला गेलेला अधिकार आहे, त्यांना कुटुंबनियोजनाची सक्ती नसणे, मशिदीतून ध्वनिक्षेपक लावून प्रार्थना करण्याची परवानगी, काश्मीरला दिले गेलेले घटनात्मक संरक्षण– लाडाची ही पाच प्रकरणे आहेत. त्यांपैकी प्रत्येकाचा परामर्श घेतल्यास काय आढळून येईल ? केवळ मुसलमानांनाच नव्हे तर इतर धर्मीयांनादेखील लग्न, संपत्ती आणि दत्तकविधान यासंबंधी त्या त्या धर्माचे कायदे या देशात लागू करण्यात आलेले आहेत. मुसलमानांना जशा काही सवलती मिळालेल्या आहेत अगदी त्याचप्रमाणे हिंदूंनादेखील हिंदू कायद्याप्रमाणे काही विशेष सवलती मिळालेल्या आहेत. कायद्याप्रमाणे जरी चार बायका करण्याची परवानगी देण्यात आलेली असली, तरी वास्तवजीवनातील चित्र काय दाखवते ? हिंदूंमध्येदेखील एकापेक्षा अधिक लग्न करण्याची प्रथा आधी होती, आजही आहे. मुसलमानांत पुनर्विवाहाची पद्धत अगदी सर्रास रूढ आहे. त्यामुळे एकीला सोडून दुसरीशी लग्न जरी झाले तरी तिचे फार हाल होत नाहीत, म्हणजे जिला तलाक दिला जातो तिचेही पुन्हा लग्न होण्यात धर्माची काही अडचण पडत नाही. अर्थात, येथे बहुपत्नित्वाच्या समर्थनाचा प्रयत्न नाही. बहुविवाहाला मुळात काही चाली-रीती व पुरुषी वृत्ती कारणीभूत आहेत. बहुविवाहाची पद्धत ही एखाद्या जातीशी किंवा धर्माशी निगडित नसून ती पुरुषी अहंकारातून आणि पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतून आलेली आहे. असे विवाह प्रबोधन, शिक्षण आणि तीव्र अशा आर्थिक स्पर्धांमुळे कमी होऊ शकतात. परिस्थितीचा रेटाच असा आहे की एकापेक्षा अधिक विवाह करून जगणे अवघड होऊन बसणार आहे. अशा पुनर्विवाहाचे प्रमाण मुसलमान समाजात किती आहे, व हिंदू समाजात किती आहे याचा विचार आरोप करणारी मंडळी कधी करीत नाहीत.

१९३१ ते ६१ या कालखंडातील बहुपत्नित्वाचे प्रमाण काय दाखवते–

दशक	हिंदू	मुस्लिम	आदिवासी बौद्ध
१९३१–४१	६·७९	७·२९	९·५३
१९४१–५१	७·१५	७·०६	१७·५३
१९५१–६१	५·०६	४·३१	१७·५८

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की हिंदू आणि मुस्लिम यांच्यात बहुपत्नित्वाच्या प्रमाणात फारसा फरक नाही, उलट, आदिवासीत हे प्रमाण अधिक आहे. असे असतानादेखील लाड केले जातात असा आरोप केला जातो. कायद्यात सवलत आहे म्हणून प्रत्येकजण एकापेक्षा जास्त लग्न करेल हा प्रचार हास्यास्पद आहे. भारतातील आणि विशेषत: दक्षिण–पश्चिम भारतातील मुसलमान हे सूफी पंथीच आहेत. सूफी पंथीयांत एकपत्नीव्रताचा आग्रह असतो. किंबहुना प्रत्येक सूफी संत हा एकपत्नीव्रतीच असतो. आपल्या अवतीभोवतीच्या मुसलमान समाजाकडे जरी पाहिले तरी बहुपत्नित्वाचे प्रमाण किती अल्प आहे, हे दिसून येईल. विशेषत: ग्रामीण भागात हे प्रमाण खूपच अल्प आहे. मध्यमवर्गीयांतून तर हे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे.

कुटुंबनियोजनाबद्दल मुसलमानांच्या दृष्टिकोणाबद्दलचा प्रचार हा असाच आत्मघातकी आहे. तो या अर्थाने की काही मूठभर मुसलमान धर्मांध मुल्ला-मौलवींच्या नादी लागून कुटुंबनियोजन करीत नसतील, पण म्हणून हिंदूंनीदेखील तोच मार्ग स्वीकारावा हा प्रचार आत्मघातकी नव्हे काय ? याशिवाय सर्वच मुसलमान हे कुटुंबनियोजनाच्या विरोधात आहेत हे म्हणणेदेखील वस्तुस्थिती नाकारण्यासारखे आहे.

"जम्मू-काश्मीर ह्या मुस्लिम बहुसंख्य (६५·८%) असलेल्या राज्यात कुटुंबनियोजनाचा स्वीकार करणाऱ्यांमध्ये मुस्लिमांचे प्रमाण (७५%). एकूण लोकसंख्येच्या कुटुंबनियोजनाच्या प्रमाणाहून अधिक आढळले. आसाममध्येदेखील नसबंदीबाबत असेच चित्र दिसते."[९]

उत्तर प्रदेश व बिहारसारख्या मागासलेल्या राज्यांत मुसलमानांत कुटुंबनियोजनाचे प्रमाण कमी आढळते. तसे ते हिंदूंमध्येदेखील कमी आढळते. म्हणजे कुटुंबनियोजनाचा संबंध कोठे तरी शिक्षण आणि आर्थिक सुबत्तेशी आहे हे स्पष्ट होते. सध्या तरी या देशात कुटुंबनियोजन कोणालाच सक्तीचे नाही. त्यामुळे हिंदूंना सक्तीचे आहे, मुसलमानांना नाही ही ओरड बिनबुडाची आहे. तिसऱ्या अपत्यानंतरच्या अपत्यांना शैक्षणिक

अनुक्रमणिका

सोयी सर्वांनाच नाकारल्या जातात.

मशिदीतून ध्वनिक्षेपक वापरण्याच्या प्रकारचे कोणीच समर्थन करू शकत नाही. पण हे ध्वनिक्षेपक बंद करायचे असतील तर हिंदूंनीदेखील आपल्या धार्मिक उत्सवाच्या वेळी ध्वनिक्षेपकाचा वापर बंद करावा अशी रास्त मागणी मुसलमानांची असते. गणेशोत्सव, दसरा–महोत्सव किंवा अशाच उत्सवा-प्रसंगी रात्रंदिवस ध्वनिक्षेपकाचा वापर जर हिंदूंना क्षम्य असेल तर मग मुसलमानांनाही हे स्वातंत्र्य का म्हणून नको? बहुसंख्याक जर एखाद्या गोष्टीची सवलत घेत असतील तर अल्पसंख्याक त्याला उत्तर म्हणून तसेच निर्णय घेत असतात त्यांच्या वागण्याची ही पद्धत जरी चुकीची असली तरी त्याला बहुसंख्या-कांची अरेरावी वृत्ती कारणीभूत असते हे विसरून चालणार नाही.

काश्मीरला जे घटनात्मक अधिकार मिळालेले आहेत व ३५० या कलमाची तरतूद करण्यात आलेली आहे, त्याला घेण्यात आलेल्या आक्षेपांना सविस्तरपणे अनेकांनी उत्तरे दिलेली आहेत. या संदर्भात ॲड. गोविंद पानसरे यांची पुस्तिका खूपच महत्त्वाची आहे. काश्मीर-मध्ये राज्याबाहेरील कोणाही व्यक्तीस जमीन–जाय-दाद खरेदी न करण्यासंबंधीचा जो कायदा आहे, तो राजा हरिसिंह यांनी, म्हणजे हिंदू राजाने केलेला होता. असा कायदा भारताच्या पूर्वेकडील जवळपास सर्वच राज्यांतून आहे.

व्होट बँक

मुसलमानांकडे सर्व पक्षांतील नेते (अपवाद फक्त भाजपाचा) हे केवळ व्होट बँक म्हणून पाहतात आणि एकगठ्ठा मतासाठी त्यांचे अनुनय केले जातात, त्यांचे सर्व लाड पुरवले जातात हा सततचा केला जाणारा आरोप. हा आरोप भाजप आणि हिंदूप्रणीत संघटना सर्वच राजकीय पक्षांवर करीत असतात. या प्रकारच्या बिनबुडाच्या आरोपामागे 'हिंदू व्होट बँक'च्या अनुनयाचा प्रयत्न आहे असा उलटा आरोप या मंडळींवर केला जाऊ शकतो.

आणखी खोलात जाऊन विचार करू पाहिल्यास हे स्पष्ट होईल की लोकशाही प्रक्रियेच्या अज्ञानातूनच हा आरोप केला जातो. कारण लोकशाहीव्यवस्थेत दर पाच वर्षांतून एकदा जनतेसमोर जावे लागते. सत्तेवर येण्यासाठी केवळ जाहीरनामा देऊन चालत नाही तर मतांचे राजकारण करावे लागते. त्यासाठी अनेकांच्या मागण्यांसंबंधी निवेदने द्यावी लागतात. प्रत्येक पक्ष केवळ मुसलमानांकडेच व्होट बँक म्हणून पाहात नाही तर प्रत्येक जातीसमूहाकडे याच पद्धतीने तो पाहात असतो. हिंदू मंडळी धर्मापेक्षा जातीचे राजकारण करीत असतात. इतर पक्षांनी मुसलमानांकडे व्होट बँक म्हणून जरी पाहिले तरी देशातील ११% मुसल-मानांच्या मतदानाची पद्धत एकाच प्रकारची दिसून येते काय? तसे जर असते तर या ११% मतांच्या आधारावर मुस्लिम प्रतिक्रियावादी निवडून येऊ शकले असते. संपूर्ण देशभर तर जाऊ द्या, प्रत्येक प्रांतातील वेगवेगळ्या भागात मुस्लिमांच्या मतदानांची पद्धत वेगवेगळी दिसून येईल. नगरपरिषदेच्या निवडणुकीत तर वार्डावार्डांतून मुस्लिम मतदारांत मतभेद आढळून येतील. "भारतातील सर्वच्या सर्व मुसलमानांच्या मत-दानाची विशिष्ट अशी एक पद्धत नाही. (एन-ब्लॉक) उत्तरेतील राज्यांतून त्यांनी सतत काँग्रेसला मते दिलेली आहेत. (अर्थात १९७५ व १९८९ चा अपवाद) बंगालमध्ये मागील १५ वर्षांपासून त्यांनी डाव्यांना मते दिलेली आहेत. आणि दक्षिणेतील राज्यांतून त्यांनी क्वचितच प्रादेशिक पक्षांना मते दिलेली आहेत."[१०]

१९५२ पासून झालेल्या निवडणुकीच्या निकाला-कडे पाहिल्यास असे लक्षात येईल की त्या त्या वेळी त्या त्या प्रदेशात जी परिस्थिती होती, त्याला अनुसरून बहुसंख्याकांच्या मतदानाच्या पद्धतीप्रमाणेच मुसल-मानांनी मतदान केलेले आहे. "एकूण ५४३ लोकसभा जागांपैकी १० मतदारसंघांत मुसलमान मतदारांची संख्या ५०% हून जास्त आहे. ७१ लोकसभा मतदार-संघांत ती २० ते ५०% आहे तर १३५ मतदारसंघांत १० ते २०% आहे. म्हणजे लोकसभेच्या २०६ जागांवर मुसलमानांच्या मतांचा परिणाम होऊ शकतो. २०% ते ५०% मुस्लिम मतदार असलेल्या या जागा १३ राज्यांतून विखुरलेल्या आहेत."[११] उपरोक्त १० जागां-वर धर्मांध मुस्लिम लीगचा उमेदवार क्वचितच निवडून आलेला आहे. ७१ लोकसभा मतदारसंघांतून बहुतेक वेळा काँग्रेसचाच विजय झालेला आहे. आणि २०६ मतदार-संघांतून एकाच पक्षाला सतत मतदान झालेले नाही. गम्मत म्हणजे हिंदू मतांसाठी सर्वच पक्ष जातीयतेचे राज-कारण करतात. मतदानाच्या दोन-तीन दिवस अगोदर

उमेदवारांच्या जातीचेच भांडवल केले जाते. " जातीसाठी माती खावी " ही म्हण घरोघरी पसरते. बहुसंख्याकांनी जातीचे राजकारण केले तर ते क्षम्य असते. (अशा वेळी पुरोगामी पक्षाची मंडळीदेखील " प्रेमात आणि युद्धात सर्वच क्षम्य असते " असे म्हणतात.) आणि त्याच वेळी मुसलमान नेत्यांनी धर्माच्या नावाने आवाहन केले की मग ते अराष्ट्रीय, धर्मांध ठरतात. आपल्यासाठी एक न्याय व इतरांसाठी एक न्याय असा हा प्रकार आहे. वस्तुस्थिती अशी आहे की या देशातील बहुसंख्य मुसलमानांनी धर्मांध शक्तींना आजपर्यंत मते दिलेली नाहीत. मुस्लिम लीग किंवा जमाते इस्लामीयांना नाही आणि भाजप किंवा विश्व हिंदू परिषद यांनादेखील नाही. त्यांच्यामुळेच आपला पराभव होतो याची जाणीव झाल्यामुळेच त्यांच्यावर अनेक बिनबुडाचे आरोप भाजप करीत असतो. यांच्यावर आरोप करून तो हिंदूंना आपल्याकडे आकृष्ट करू इच्छितो.

लोकशाहीव्यवस्था निवडणुकीच्या आधारावर उभी असते. निवडणूक म्हटल्यानंतर जास्तीत जास्त मते आपल्याकडे खेचण्याचे डावपेच येणार. याशिवाय लोकप्रतिनिधी म्हणून जाताच येत नाही. एकगठ्ठा मतांसाठी सर्वच पक्ष प्रयत्न करीत असतात. हिंदूंतील काही जातींचे एकगठ्ठा मतदान होत असते; पण त्याकडे दुर्लक्ष करण्यात येते.

स्वातंत्र्यानंतर मुसलमानांचे लाड झाले म्हणजे नेमके काय झाले ? त्यांच्यासाठी शिष्यवृत्त्या जाहीर झाल्या काय ? नोकरीत विशेष आरक्षण दिले गेले काय ? त्यांचा उद्योगव्यवसाय वाढावा म्हणून केवळ या मंडळींना विशेष सोयी-सवलती देण्यात आल्या आहेत काय ? " या देशात लाड फक्त एकूण हिंदूलोकसंख्येपैकी साडेतीन टक्के ब्राह्मणांचे व १५ % ते २० % असलेल्या सत्तेवरील जातीच्या मंडळींचे होत आहेत. एकूण मुस्लिम लोकसंख्येपैकी एकसहस्रांश टक्के मुस्लिमांचे, धार्मिक नेत्यांचे लाड झाले आहेत. ९० % मुसलमान समाज विकलांग आहे. "[१२]

मुसलमानाची व्याख्या करताना एकाने फार समर्पक शब्दांत म्हटले आहे की, " मुफलिसी (गरिबी) तेरा नाम है मुसलमान " काही धर्मांध मुसलमान निवडणुका आल्या की मशिदीची डागडुजी, प्रकाशव्यवस्था किंवा अशीच कामे करून घेतात. कारण त्या मंडळींनादेखील मुसलमान समाज हा आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला असावा असे वाटत असते. मुसलमानाचे लाड होत असतील तर नोकऱ्यांतील त्यांचे प्रमाण काय दाखवते– " लोकसंख्येमध्ये मुस्लिमांचे प्रमाण सुमारे १२ % असताना राज्य व केंद्र शासनाच्या नोकऱ्यांत त्यांचे प्रमाण ६ % व ४.४ % एवढेच आढळते. प्रथम व द्वितीय श्रेणी अधिकाऱ्यांत हे प्रमाण आणखीनच कमी आहे. प्रथमश्रेणी अधिकाऱ्यांत केंद्र सरकारामध्ये १.६ % तर राज्य सरकारामध्ये ३.३ %, आर. ए. एस., आय. पी. एस., रेल्वे यांमध्ये २.५ ते ३ % तर बँकांत २ % एवढे आहे. याचा संबंध एकदंरीत शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणात आहे. "[१३] यासोबतच बदलती हिंदू मानसिकतादेखील यासाठी कारणीभूत आहे.

उर्दू माध्यमांच्या शाळा

मुसलमानांत आधुनिक शिक्षणाच्या प्रचार-प्रसार व्हावा या हेतूने गेल्या शतकात सर सैय्यद अहमदनी अलिगढ येथे इंग्रजी माध्यमाची शाळा व कॉलेज हे सुरू केले. मुसलमानांतील प्रतिष्ठित, श्रीमंत, जमीनदारवर्गातील म्हणजे अश्रफ मुसलमानांनी याचा पुरेपूर फायदा उचलला. पण कष्टकरी सामान्य मुसलमानांमध्ये शिक्षणाचा प्रचार-प्रसार होऊ शकला नाही. स्वातंत्र्यानंतर इतर कष्टकरीवर्गातील मुलांप्रमाणे मुस्लिम मुलेमुलीदेखील प्रादेशिक भाषेच्या शाळेतून शिक्षण घेत होती. पण १९७० नंतर संपूर्ण भारतात आणि विशेषत्वाने महाराष्ट्रात उर्दू शाळा उघडण्याची टूम निघाली. अल्पसंख्याकांच्या शाळा म्हणून शासनाच्या विशेष सवलती मिळू लागल्या, त्या सर्वच अल्पसंख्याकांना मिळतात. याचा परिणाम म्हणून शिक्षणाचा धंदा करणारी, जात्यंध व धूर्त मुसलमान नेत्यांनी उर्दू शाळा उघडण्याचा सपाटा सुरू केला. धर्मांध मंडळींनी आधीच उर्दूचा संबंध धर्माशी जोडलेला होता. अशिक्षित भोळ्याभाबड्या सामान्य मुसलमानांना या शाळा अधिक सुरक्षित वाटू लागल्या. जिल्हा परिषदेच्या, शासनाच्या किंवा बहुसंख्याकांच्या शाळांतून मुसलमान मुलांकडे सतत संशयाने किंवा " परका ", " वेगळा " म्हणून पाहिले जाते. ग्रामीण भागापेक्षा शहरात ही स्थिती अधिक भयानक आहे. कोवळ्या मनावर जे विषारी डंख होतात, त्याचे अस्वस्थ करणारे वर्णन जावेद कुरेशी यांच्या लघुकथा संग्रहातून, " औरंगजेब

आणि जोशी " मधून पदोपदी जाणवते. बहुसंख्याकांच्या या वृत्तीमुळेदेखील उर्दू शाळांना प्रतिसाद मिळत गेला. पण या शाळेतून शिकणाऱ्यांचे भवितव्य काय असा प्रश्न धड संस्थाचालकांच्या मनात येत नाही आणि धड पालकांच्या मनात येत नाही. या अशा शाळांमुळे वेगळेपणाची भावना वाढीस लागते. एके ठिकाणी प्रा. फक्रुद्दीन बेन्नूर यांसारखी मंडळी मुस्लिम-मराठी लेखक सम्मेलने घेत आहेत, मुसलमानांनी त्या त्या प्रदेशाच्या भाषेतून लिहावे, तीच व्यवहाराची भाषा करावी असा आग्रह ही मंडळी करीत असताना काही स्वार्थी, धर्मांध मंडळी शासनामार्फत मिळणाऱ्या सवलतींचा फायदा आपल्या समाजास आणखी बंदिस्त करण्यासाठी वापरत आहेत. या अशा शाळांतून त्याच प्रकारचे गैरप्रकार चाललेले असतात ज्या प्रकारचे गैर-प्रकार बहुसंख्याकांच्या शाळेतून चालतात. उर्दूला जिवंत ठेवण्यासाठी म्हणून कित्येक पिढ्यांचे भविष्य अस्थिर, बंदिस्त आणि काही प्रमाणात बरबाद करण्याचा हा प्रयत्न मुसलमानांतील पुरोगामी मंडळींनी उधळून लावण्याची गरज आहे.

बुद्धिवाद्यांची भूमिका

दोन्हीकडच्या बुद्धिवाद्यांच्या भूमिका तपासून पाहिल्यास त्यांच्यातही फारसा गुणात्मक फरक दिसून येत नाही. त्यांच्यात दोन वर्ग स्पष्टपणे आढळून येतात.

अ) पहिला वर्ग "धर्मश्रद्धेस" केंद्रबिंदू मानणाऱ्यांचा आहे. हिंदू बुद्धिवाद्यांना वाटते की, आजपर्यंत मुसलमानांचे खूप लाड झाले, ही मंडळी समान नागरी कायदा, शाहबानो प्रकरण, काश्मीर प्रकरण, कुटुंबनियोजन, बहुपत्नीत्वाची चाल यांबद्दल तावातावाने बोलत असतात. हे बोलत असताना त्यांच्या डोक्यात हे गृहितकृत्य पक्के असते की सर्व मुसलमान हे धर्मांध आहेत, अराष्ट्रीय आहेत, आणि सर्व हिंदू राष्ट्रवादी, एकपत्नीवादी व कुटुंब-नियोजन करून घेणारे असे आहेत. वस्तुस्थितीचा विचार करण्याची गरज त्यांना भासत नाही. या प्रश्नांबद्दल कसलाही तपशील ते देत नाहीत. समान नागरी कायदा करण्यात हिंदूंचे हितसंबंध अधिक धोक्यात येणार आहेत, ती किंमत हिंदू देण्यास तयार आहेत काय ? १९७७–७९ दरम्यान जनता दलाच्या हातात अडीच वर्षे सत्ता असताना हा कायदा का करण्यात आला नाही, यातील अडचणी काय आहेत याचा विस्तार ते देत नाहीत. संपूर्ण देशातून केवळ महाराष्ट्र विधानसभेतूनच समान नागरी कायदा व्हावा असा प्रस्ताव केंद्राकडे पाठवण्यात आला पण मध्य प्रदेश व उत्तर प्रदेशामध्ये संपूर्ण सत्ता असताना भाजपाने असा प्रस्ताव केंद्राकडे का पाठवला नाही याचे उत्तरदेखील ही मंडळी देऊ इच्छित नाहीत. संपूर्ण हिंदीभाषी प्रदेशातील हिंदू, समान नागरी कायद्याच्या विरोधात आहेत याचे भान या मंडळींना राहात नाही.

भाजप, विश्व हिंदू परिषद तर जाऊ द्या, अगदी स्वतःला समाजवादी म्हणणारी मंडळीदेखील सर्वच मुस्लिमांबद्दल आक्रमकपणे बोलतात, सत्ताधारी पक्षावर त्यांचे लाड केले म्हणून खापर फोडतात पण स्वधर्मात धर्मांध शक्ती का वाढत आहेत, समाजवादी विचाराची व चळवळीची पीछेहाट का होत आहे याबद्दल काहीच बोलत नाहीत. मुस्लिम प्रबोधनापेक्षा आज गरज आहे ती बहुसंख्याकांच्या प्रबोधनाची, बहुसंख्याकांच्या डोक्यात आणि डोळ्यांत अल्पसंख्याकांबद्दल संशयाचे, तिरस्काराचे आणि परकेपणाचे जे ढग निर्माण झालेले आहेत त्यांना दूर सारण्याचे. या मंडळींच्या या वृत्तीमुळेच, यांच्या सततच्या बिनबुडाच्या तर्कामुळे सामान्य हिंदूदेखील मुसलमानांकडे संशयाने पाहात आहे. प्रादेशिक भाषेतील बहुतेक सर्व वृत्तपत्रांतून मुसलमानांबद्दल जे छापले जाते ते किती एकांगी, विषारी व अन्यायकारक आहे हे या समाजाकडे जवळून पाहिल्यानंतर लक्षात येते. सगळी प्रसार-माध्यमे आज दोन धर्मीयांमधील अंतर प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे रुंदावण्याचे काम करीत आहेत.

तिकडे मुसलमानांमध्येदेखील धर्मश्रद्धेस खतपाणी घालणारा, अल्पसंख्याकांच्या नावावर वेगळेपण टिकवून ठेवण्याचा उद्योग करणारा, कुराणातील आदेश अंतिम आहेत असे सांगणारा, सर्व-सामान्य मुसलमानांना बहुसंख्याकांच्या भीतीची सतत जाणीव करून देणारा एक वर्ग आहेच. हा केवळ मुल्ला-मौलवींच्या रूपात नसून वृत्तपत्रे, नियतकालिके या प्रसारमाध्यमांच्या रूपांतदेखील आढळतो. मुल्ला-मौलवी अलगता टिकवून ठेवण्याचा प्रचार मशिदीतून करीत असतात, तर हे बुद्धिवादी प्रसारमाध्यमांतून उघडपणे तसेच

आवाहन करीत असतात. दोन्हीकडचे हे बुद्धिवादी म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हे बुद्धिवादी स्वधर्मातील श्रीमंतांचे, प्रतिष्ठितांचे हितसंबंध मात्र तेवढ्याच तत्परतेने जपत असतात.

(आ) बुद्धिवाद्यांचा दुसरा प्रकार हा टोकाची भूमिका घेणाऱ्यांचा आहे. आपल्या स्वतःच्या कोशात राहणारा, जनसामान्यांची नाडी न समजलेला पण समाजाच्या प्रगतीची सतत काळजी करणारा हा वर्ग आपल्यापरीने खूप प्रामाणिक असतो, हा वर्ग "धर्मश्रद्धा" आणि "धर्म" नाकारून प्रगतीची भाषा करीत असतो. कोणत्याही एका विशिष्ट धर्माबद्दल कसलाही अहंकार, किंवा श्रद्धा न बाळगता तो सर्वच धर्मांवर तुटून पडत असतो. याचे विश्लेषण तर्कशुद्ध, पुराव्यासहित जरी असले तरी त्याला सर्व पातळींवरून प्रतिसाद मिळत नसतो, कारण काही व्यक्ती, काही कुटुंबे, काही गट धर्मश्रद्धा नाकारून पूर्णपणे नास्तिक भूमिका घेऊन जगू शकतात, पण संपूर्ण समाजाला या पातळीवर आणणे अशक्य असते. कठोर बुद्धिवादी व चिकित्सक भूमिका घेणाऱ्या मुस्लिम विचारवंतांचीही संख्या या देशात काही कमी नाही. न्या. छगला, मोईन शाकिर, फैज अहमद फैज, कैफे आजमीपासून ते हमीद दलवाईपर्यंत ही यादी लांबवता येईल.

तिसरी परंपरा

या दोन्ही प्रकारच्या बुद्धिवाद्यांकडून या देशातील सांप्रदायिकतेचा प्रश्न सुटणारा नाही. यापेक्षा एक तिसरी परंपरा साधुसंतांची, समन्वयाची भूमिका घेणाऱ्यांची, सहिष्णुतेची आहे. ही परंपरा अगदी अमीर खुसरोपासून ते म. गांधींपर्यंतची आहे. मध्यकाळात अशा प्रकारच्या बुद्धिवंतांची संख्या दोन्हीकडे भरपूर प्रमाणात होती. पण अलीकडच्या काळात आणि त्यातही स्वातंत्र्यानंतर ही तिसरी परंपरा क्षीण होऊ लागलेली आहे. राजकीय क्षेत्रातील मंडळी पहिल्या दोनपैकी कुठल्या तरी एका परंपरेत मोडतात. मध्यममार्गी पक्ष म्हणून ज्यांचा लौकिक आहे, त्यांच्याही भूमिका हळूहळू बदलत आहेत.

प्रश्न अल्पसंख्याकांचा

वस्तुस्थिती अशी आहे की भारतातील हिंदू-मुसलमानांचा प्रश्न हा दोन धर्मांतील ताणतणावांचा प्रश्न नसून बहुसंख्याक विरुद्ध अल्पसंख्याक असा आहे. "तुम्ही सर्वजण अल्पसंख्याक आहात, बहुमताच्या जोरावर ते तुमच्या कल्याणासाठी, सुरक्षिततेसाठी काहीच करणार नाहीत" ही भावना सामान्य मुसलमानांच्या मनात अगदी खोलवर रुजवण्यात आलेली आहे. अल्पसंख्याकांचा प्रयत्न जगभरच्या लोकशाही देशात डोके वर काढत आहे. जगातील इतर लोकशाही देशांतील बहुसंख्याक विरुद्ध अल्पसंख्याक यांच्यातील ताणतणावांचा अभ्यास केल्यास भारतातील या प्रश्नास धर्माची जी चौकट लावण्यात आलेली आहे, हे लक्षात येईल. विकसनशीलच नव्हे तर विकसित देशांचाही या अनुषंगाने अभ्यास करण्याची गरज आहे. जगातील सर्वच अल्पसंख्याक गट हे आपले अंतर्गत मतभेद विसरून आपल्या अस्तित्वाच्या सुरक्षिततेसाठी एकत्र येत असतात, संघटित होत असतात आणि जगातल्या सर्वच लोकशाही देशांतील विविध पक्ष या अल्पसंख्याकांची एकगठ्ठा मते मिळविण्यासाठी धडपडत असतात, अनेक तडजोडी करीत असतात. "मताच्या राजकारणापायी यांचे लाड चाललेले आहेत" असे उद्वेगाचे उद्गार काढणाऱ्यांना एक तर लोकशाहीव्यवस्थाच समजलेली नसते किंवा अप्रत्यक्षपणे ते हुकुमशाहीचे समर्थन करीत असतात. लोकशाहीत मतांचेच राजकारण चालत असते. कोणी बहुसंख्याकांचे लाड करीत असतात, तर कोणी विशिष्ट जातीचे लाड करीत असतात. मुसलमानांच्या बाबतीत मात्र त्यांचे कसलेच लाड न होता लाड केल्याची आवई उठवली जात आहे.

निष्कर्ष...

दोन्हीकडची सर्वसामान्य माणसे मात्र तेवढीच भाबडी, असुरक्षित व परिस्थितीने गांजलेली आहेत. त्यांना आपल्याकडे वळवण्याचे प्रयत्न दोन्हीकडची राजकीय व बुद्धिवादी मंडळी करीत आहेत, दोन्हीकडची ही मंडळी दोन वेगवेगळ्या प्रकारची टोकाची भूमिका घेत आहेत. धर्मश्रद्धेस व लोकशाही परंपरेस नाकारून हा प्रश्न सुटणारा नाही तर तिसऱ्या परंपरेचा शोध घ्यावा लागेल. ही तिसरी परंपरा या देशात खूप सुदृढ अशी होती. अमीर खुसरोपासून ते निदा फाजली या कवीपर्यंत, अकबरापासून ते छत्रपती शिवाजी या राजापर्यंत आणि कबीरापासून ते म. गांधींपर्यंतच्या संतमहात्म्यांची ही परंपरा आहे. प्रश्न एवढाच आहे की आपण कोणत्या परंपरेचा स्वीकार करणार आहोत ?

अनुक्रमणिका

संदर्भ

१. **संस्कृति के चार अध्याय**; श्री. रामधारीसिंह दिनकर; पृ. ३८४-३९६.
२. कित्ता; पृ. ३८९.
३. **मराठी तत्त्वज्ञान महाकोश**; सं. प्रा. दे. द. वाडेकर; पृ. १४४.
४. **संस्कृति के चार अध्याय**; श्री. रामधारीसिंह दिनकर; पृ. ३१६.
५. कित्ता; पृ. ३८९.
६. **हिंदुस्तानचा अभिनव इतिहास**; पृ. ५२८.
७. **महात्मा फुले समग्र वाङ्मय**; संपादकाचे निवेदन; पृ. २७
७अ. **स्ट्रगल फॉर फ्रीडम**; ले. आर. सी. मजुमदार; भारतीय विद्या भवन; पृ. ६१५.
८. **हिंदू-मुस्लिम तणाव आणि भारतीय एकात्मकता**; शंकर ब्रह्मे; समान विज्ञान ग्रंथालय, पुणे.
९. कित्ता; पृ. ४७.
१०. **इंडिया टूडे (इंग्रजी)**; एप्रिल ३०, १९९१; पृष्ठ ५४; अरुण चौरे यांचा लेख.
११. कित्ता.
१२. **बंद दरवाजा**; सं. लक्ष्मण माने; फेब्र.-मार्च, ९३; पृष्ठ १७; संदीप जावळे यांचा लेख.
१३. **हिंदू-मुस्लिम तणाव आणि भारतीय एकात्मकता**; पृ. ३८.

* * *